नवीन प्रांतांचे शोधक


लेखक: सी. जे. नॅडन


चित्रे: जोएल स्नायडर



नवीन प्रांतांचे शोधक

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन





नवीन प्रांतांचे शोधक म्हणजे जगाला माहीत नसलेल्या एखाद्या नव्या प्रांतात पहिल्याप्रथम पाऊल ठेवून तिथे वस्ती करणारे लोक. हे शोधक वेगळ्या वाटा चोखाळून प्रवास करत आणि नवनव्या प्रदेशांचा शोध घेत.


या शोधक लोकांनी अमेरिकेचा नकाशा बदलून टाकण्याचे अचाट काम केले. ते पूर्वेकडील ॲपेलेशियन पर्वतराजींपासून पश्चिमेकडील प्रशांत महासागरानजिकच्या नवनव्या प्रदेशांमध्ये जाऊन वसले. मग इतर लोकांनीही त्यांच्या मार्गाचे अनुसरण करून त्या-त्या प्रदेशांमध्ये वस्ती केली.









पण बऱ्याच शोधक लोकांना कोणतीही प्रसिद्धी मिळाली नाही. खरंतर, हेच लोक शोधक लोकांच्या कथा-कहाण्यांचे नायक होते. अमेरिकेच्या विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.



अनेक शोधक लोकांना अमेरिकेत चांगली प्रसिद्धी मिळाली. त्यांमध्ये *डॅनियल बून* आणि *डेव्ही क्रॉकेट* ही दोन नावे सुपरिचित आहेत.



ई.स. 1760 ते 1850 या काळात शोधक लोक दोनवेळा अधिकाधिक पश्चिमी प्रदेशांकडे सरकले आणि तिथेच स्थायिक झाले. पहिल्या वेळी त्यांनी मिसिसीपी खोऱ्यात वस्ती केली आणि दुसऱ्या वेळी त्यांनी पश्चिमेकडील पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरील प्रदेशांमध्ये वस्ती केली.




दूरदूरचा प्रवास करत असल्यामुळे शोधक लोकांना शूर आणि बळकट असणे आवश्यक होते. पण ते स्वत: हेतूपूर्वक असा काही विचार करत नसत. ते सतत सुपीक जमिनी, मोकळी मैदाने आणि नवीन आयुष्य सुरू करण्याबाबत विचार करत असत.





सुरुवातीला, अमेरिकेत बहुतांशी लोक शेती करत. पण शोधक लोक इतरही काही उद्योग करू लागले. ते अन्नासाठी शिकार करायला शिकले, कुऱ्हाडीने जंगल साफ करून घर बनवायला शिकले तसेच वस्त्र बनवायला, तुटलेले नांगर दुरुस्त करायला आणि नाव बनवायलाही शिकले. कोणी आजारी पडले तर काय करायचे, हेदेखील ते शिकले. ही कौशल्ये त्यांनी इतर लोकांनाही शिकवली.









शोधक लोक ही सर्व कौशल्ये स्वतःसाठी शिकले. कारण ही कामे करून देणारे कुशल कारागिर तेव्हा उपलब्ध नव्हते. त्याकाळी अमेरिकेत शहरे नव्हती, हॉस्पीटल नव्हती, अन्नधान्याची दुकाने नव्हती, शाळा नव्हत्या आणि वस्तू दुरुस्त करून देणारे कारागिर नव्हते. तिथे फक्त निर्मनुष्य, ओसाड प्रदेश होते आणि रानटी *इंडियन* जमाती होत्या.

शोधक लोक येण्याअगोदर अमेरिकी इंडियन हेच खरंतर अमेरिकेचे मूळ निवासी होते. अमेरिकी गवताळ आणि मैदानी प्रदेशांत भटकंती करणारे ते पहिलेवहिले लोक होते. तेथील स्वच्छ, खळाळत्या झऱ्यांमध्ये त्यांनीच पहिल्यांदा मासेमारी केली. वस्त्र, अन्न आणि आसऱ्यासाठी जनावरांची शिकार त्यांनीच पहिल्याप्रथम तेथे सुरू केली.

अमेरिकी इंडियन ही तेथील गर्द आणि सुंदर जंगलांमध्ये समूहाने राहाणारी पहिलीवहिली जमात होती.



कधीकधी इंडियन आणि स्थलांतरित शोधक लोक शांततेत राहात. पण शोधक लोक नेहमी इंडियन जमातींच्या जमिनींवर ताबा मिळवू पाहात. या कारणावरून कित्येकदा त्यांच्यात आणि इंडियन जमातींमध्ये युद्ध होई. प्रत्येक समूह आपापल्या जीवनशैलीचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करत असे.



शोधक लोकांना अचानक हल्ला होण्याचे भय असे. स्वसंरक्षणासाठी ते बऱ्याचदा एक इमारत उभारत. इमारतीभोवती ते ओंडक्यांची भिंत बांधत. ही भिंत 10 फूट किंवा 3 मीटर उंच असे. भिंतीमध्ये असलेल्या फटींमधून शोधक लोक बंदुकीतून गोळ्या झाडू शकत.





शोधक लोक सहसा घोडागाडीतून प्रवास करत. भटक्यांच्या किंवा फरच्या व्यापाऱ्यांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत ते पश्चिमेकडे प्रवास करत. कधीकधी जंगलातील अरुंद पाऊलवाटा आणि पर्वतांमधील मोकळ्या जागा याच शोधकांच्या वाटा असत.

या वाटा उंचसखल असत आणि त्यांवर खड्डे आणि जनावरांची विष्ठा असे. त्यांतून जाताना गाडीची चाके तुटत. पावसाळ्यात या पाऊलवाटा दलदलीने भरून चिखल होत असे..



पाऊलवाटा कितीही खराब असल्या तरी त्यांची नावे मजेदार होती. त्यांना जुनी स्पॅनिश पाऊलवाट, रानटी पाऊलवाट, सान्ता फे आणि ओरेगॉन पाऊलवाट अशी नावे होती. पाऊलवाटेने प्रवास करणे हे मोठे साहसाचे आणि काहीवेळा धोक्याचे काम असे.






कधीकधी शोधक लोक धुळीने भरलेली पाऊलवाट सोडून पाण्यातून प्रवास करत. *ओहायो* आणि *मिसिसीपी* नद्या पार करण्यासाठी त्यांनी सपाट तळाच्या बोटी तयार केल्या होत्या.


कॅलिफोर्नियाला जाण्यासाठी चार ते पाच महीने प्रवास करावा लागे. अशा दीर्घ प्रवासाची योजना बनवणे खूप महत्त्वाचे असे. कुटुंबाचे जवळजवळ सगळे सामान गाडीत भरले जाई. गाडीवर कॅनव्हास कापडाचे आवरण घालत आणि खेचर किंवा बैलांच्या मदतीने गाडी वाहून नेत.

कित्येक शोधक कुटुंबांनी पश्चिमेचा प्रवास सोबतीने केला. कधीतर एकावेळी शंभर कुटुंबे गाड्यांच्या काफिल्यातून एकत्रच प्रवास करत. सपाट प्रेअरी मैदानांतून प्रवास करताना या गाड्या जहाजांसारख्या भासत. त्यामुळे या गाड्यांना *प्रेअरी स्कूनर्स (प्रेअरी जहाजे)* म्हणत.



सगळेच शोधक गाड्यांनी प्रवास करत नसत. काहीजण घोंड्यावर स्वार होऊन प्रवास करत. काही तर पायीपायी चालतच प्रवास करत.

कुणी एकजण गाड्यांच्या काफिल्याचे नेतृत्त्व आणि मार्गदर्शन करत असे. शहराच्या महापौरासारखी एकमताने त्याची निवड होत असे. सारे प्रवासी या मार्गदर्शकाचे आदेश पाळत. काफिल्याला जंगलातून सुरक्षितपणे नेण्याचे काम तो करत असे. मार्गदर्शकाला जंगलातील वाटांचे, पाणवठ्यांचे ज्ञान असणे फार आवश्यक असे.





किट कार्सन आणि *जिम ब्रिजर* हे मार्गदर्शक त्याकाळी खूप प्रसिद्ध होते.




गाड्यांचा काफिला बऱ्याचदा मिसूरी राज्यातील *इंडिपेंडन्स* शहरातून निघत असे. तिथून हा काफिला वायव्य दिशेत असलेल्या ओरेगन राज्याकडे कूच करत असे. पुढे हा काफिला मोठमोठी मैदाने आणि उंच रॉकी पर्वत पार करत असे.

ओरेगनमधील *फोर्ट हॉल* येथे काही शोधक प्रवासी थांबत. कॅलिफोर्नियाला जाणारे प्रवासी आपला प्रवास सुरूच ठेवत. *सॅक्रमेंटो* शहरातील सटरच्या किल्ल्याकडे जाणाऱ्या मार्गाने ते पुढे जात.

न्यू मेक्सिको राज्याच्या *सॅन्टा फे* शहराकडे जाणारे शोधक नैऋत्य दिशेत प्रवास करत. हा दीर्घ प्रवास खूप खडतर आणि धोकादायक असे. दिवसभरात काफिला फारतर 15 ते 20 मैल किंवा 24 ते 32 किलोमीटर एवढाच प्रवास करू शके. जवळचे अन्नधान्य संपून जात असे, गाड्या मोडून जात, बैल आणि काही प्रवासीसुद्धा आजारी पडत आणि मरत.






काही इंडियन जमातींनी या प्रवाशांना मदत केली. पण काही जमातींनी काफिल्यावर हल्ला चढवला.

सुरक्षिततेसाठी प्रवासी रात्री आपल्या गाड्या वर्तुळाकार उभ्या करत. याला ते *नाईट रिंग (रात कडे)* म्हणत.




उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये डास आणि माश्यांचा उपद्रव होत असे. हिमवर्षाव झाला तर गाडी बर्फाच्या चादरीखाली झाकली जाई.






हवामान हीसुद्धा एक चिंतेची बाब असे. खूप पाऊस पडला तर गाडीची चाके चिखलात रुतून बसत. पूर आला तर सारे सामान वाहून जाई.



बहुतांशी गाड्या पूर्वेकडील प्रदेशातून वसंत ऋतूत निघत. त्यांना हिवाळ्याआधी पश्चिमेकडील प्रदेशात पोहोचायचे असे.

1846 साली *जॉर्ज* आणि *जेकब डोनर* यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या प्रवाशांचा एक गट एका भयंकर हिमवादळात सापडला. तब्बल दोन महीने ते कॅलिफोर्नियातील *सिएरा नेवाडा* पर्वराजींमध्ये अडकून पडले. त्यांच्याकडचे अन्न संपले तेव्हा त्यांनी मिळेल ते, अक्षरशः स्वतःचे बूटसुद्धा, खाऊन भूक शमवण्याचा प्रयत्न केला. निम्म्यापेक्षा जास्त प्रवासी मृत्युमुखी पडले. त्या जागेला आता *डोनर पास* म्हणतात.







कित्येक महिन्यांच्या दीर्घ प्रवासानंतर प्रवासी त्यांच्या नव्या गृही पोहोचले. पण त्यांच्या हालअपेष्टा काही संपल्या नाहीत. सर्वात आधी त्यांना धान्य पेरणीसाठी जमिनीची साफसफाई करावी लागली. घर बांधण्यापेक्षाही हे जास्त महत्त्वाचे होते. अन्नधान्य नसेल तर प्रवासी भुकेने मेले असते.

पुरुष, स्त्रिया आणि मुले या सर्वांनीच जमिनीची साफसफाई करून पेरणी करण्यात मदत केली. त्यांच्याकडे यंत्रे नव्हती, होत्या फक्त कुऱ्हाडी आणि त्यांचे हात. पेरणीच्या कामात शेजाऱ्यापाजाऱ्यांनी एकमेकांना मदत केली. *सहकाराची भावना* हे शोधकांच्या प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग असे.

जमीन साफ केल्यानंतर लोकांनी आपापली घरे बांधली. अनेक घरे म्हणजे केवळ ओंडक्यांची एक खोली होती. प्रवाशांनी झाडे तोडून हे ओंडके मिळवले. ओंडके रचून त्यांनी घर बनवले. ओंडक्यांमधल्या फटी त्यांनी चिखल आणि मॉस वनस्पतीने बुजवल्या. या कामात सगळ्यांनी एकमेकांना मदत केली.





खोलीत उबेसाठी शेकोटीची जागा होती. प्रवाशांनी घरातील फर्निचर स्वतःच बनवले. काहीवेळा घरातील लोक रजईच्या ढिगावरच झोपत. घरात पोटमाळा असेल तर तिथे मुले झोपत. पोटमाळ्यावर जाण्यासाठी एक शिडी होती.



नव्या जागेत स्थिरावण्यासाठी प्रवासी लोकांनी खूप कष्ट केले. पण हे लोक मौजमजा करण्यासाठीही वेळ काढत. शक्य तेव्हा त्यांची कुटुंबे एकत्र येऊन नाचगाणे करत, मेजवान्या झोडत. मक्याच्या हंगामात तसेच गोधड्या तयार करण्याच्या प्रसंगी ते अशी मौजमजा करत. त्यावेळी ते धावण्याच्या आणि नेमबाजीच्या स्पर्धा आयोजीत करत. ते झाल्यावर कुणीतरी व्हायोलिन वाजवू लागे आणि सगळे नाचू-गाऊ लागत.





अमेरिकी शोधक अधिकाधिक पश्चिमेकडे प्रवास करत राहिले. त्यामुळे त्यांचा देश अधिकाधिक विस्तारत गेला, मजबूत बनत गेला.

शोधकांचे जीवन कष्टप्रद असले तरी त्यांच्याकडे अनेक उत्तम गोष्टी होत्या. त्यांच्याकडे मोकळी मैदाने, सुपीक जमीन, ताजे पाणी, शुद्ध हवा आणि मुख्य म्हणजे स्वातंत्र्य होते.

आणि त्यांच्याकडे दीर्घ शोधप्रवास करण्यासाठी आवश्यक असलेली तीव्र इच्छाशक्ती होती. त्यांच्या या इच्छाशक्तीमुळेच अमेरिका एक महान राष्ट्र बनण्यात मदत झाली.



समाप्त

